गांवकरी
YCMOU PRO GK
P7 100125
www.gavakari.net
10 Jan 2025 - Page 7

# वसंत कानेटकरांवर उद्या नाशिकमध्ये चर्चासत्र

**नाशिक : प्रतिनिधी**

साहित्य अकादमी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि मराठा विद्या प्रसारक समाज संस्था - नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने ख्यातनाम नाटककार वसंत कानेटकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त उद्या शुक्रवार दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी एक परिसंवाद आयोजित करण्यात आलेला आहे. वसंत कानेटकर : व्यक्ती आणि साहित्य या विषयावरील हा परिसंवाद के. टी. एच. एम. महाविद्यालयाच्या व्ही. एल. सी. सभागृहात होणार असून त्याचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता होणार आहे.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक तथा साहित्य अकादमीचे केंद्रीय कार्यकारी मंडळ सदस्य विश्वास पाटील राहणार आहेत. तसेच यावेळी मुक्त विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण विद्या शाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम, साहित्य अकादमी, मुंबई चे प्रभारी अधिकारी ओम प्रकाश नागर, साहित्य अकादमीचे सामान्य परिषदेचे सदस्य डॉ. दिलीप धोंडगे, मराठा विद्या प्रसारक संस्थेचे शिक्षणाधिकारी भास्कर ढोके, अंजली कानेटकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. परिसंवाद उद्घाटनानंतर दुपारी ११.४५ ते १२.०० या वेळेत नाटककार वसंत कानेटकर यांच्याविषयी डॉ. वृन्दा भार्गवे यांनी केलेला चरित्रपट दाखवण्यात येईल. त्यानंतर प्रथम सत्रात दुपारी १२.०० ते १.३० वाजेदरम्यान 'कानेटकरांची पौराणिक व ऐतिहासिक नाटके' (उल्हास रत्नपारखी), 'कानेटकरांची चरित्रात्मक नाटके' (नाटककार आशुतोष पोतदार) आणि 'कानेटकरांची सामाजिक नाटके' (ज्येष्ठ दिग्दर्शक प्रतिमा कुलकर्णी) या विषयावरील निबंध वाचन करण्यात येईल. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नाटककार व अभ्यासक सतीश आळेकर राहणार आहेत. द्वितीय सत्रात दुपारी २.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत 'कानेटकरांच्या नाटकांची समकालीनता' याविषयी ज्येष्ठ दिग्दर्शक विजय केंकरे व डॉ. प्रवीण भोळे हे बोलतील. श्री. स्वानंद बेदरकर हे कानेटकरांचे कथात्म साहित्य या विषयावर विवेचन करतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समीक्षक व अभिनेते माधव वझे राहणार आहेत. ज्येष्ठ साहित्यिक तथा पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ यांच्या एकूण विवेचनाने या परिसंवादाचा समारोप होईल. अध्यक्षस्थानी हेमंत टकले राहणार आहेत.